# BDC LIBRARY

## News Paper Clipping

## A.Y. 2025-26

# स्पर्धेच्या युगात कष्टाशिवाय यश मिळत नाही : कोंडिबा शिंदे

लोकमत न्यूज नेटवर्क

**पाटण :** 'स्पर्धेच्या युगात टिकून राहायचे असेल तर सातत्याने कष्ट करणे अत्यावश्यक असून, कष्टाशिवाय यश मिळत नाही,' असे प्रतिपादन राष्ट्रीय सेवा योजनेचे सातारा जिल्हा समन्वयक प्रा. कोंडिबा शिंदे यांनी केले.

बा. दे. कॉलेज, पाटण यांच्या राष्ट्रीय सेवा योजना विशेष श्रमसंस्कार शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी मौजे ढोरोशी, ता. पाटण येथे प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते.

यावेळी कोयना एज्युकेशन सोसायटीचे संचालक संजीव चव्हाण, शरद देशमुख, प्र. प्राचार्य डॉ. व्ही. ए. कळंत्रे, ढोरोशी गावच्या उपसरपंच सुवर्णा मगर, डॉ. आर. टी. सपकाळ यांची प्रमुख उपस्थिती होती.

एनएसएस कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. लक्ष्मण गणगे यांनी प्रास्ताविक करताना दि. २९ डिसेंबर २०२५ ते ४ जानेवारी २०२६ या कालावधीत राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती दिली. तर कनिष्ठ विभागाचे कार्यक्रम अधिकारी प्रा. बजरंग चव्हाण यांनी प्रमुख पाहुण्यांचा परिचय करून दिला. या कार्यक्रमास शामराव मगर, अण्णा पुजारी, राहुल पुजारी, प्राचार्य अनिल मोहिते, एनएसएस सदस्य प्रा. प्रदीप गायकवाड, प्रा. विशाल कांबळे यांच्यासह ज्युनिअर व सिनियर विभागातील सर्व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.